स्थायी समितीच्या **शुक्रवार** दिनांक 30–07–2010 रोजी दुपारी 12–30 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | श्री. संदिप दिवाकर जोशी | अध्यक्ष |
| 2. | सौ. अरुणा जगदीश ग्वालबंशी | सदस्य |
| 3. | श्री. रवींद्र डोळस | सदस्य |
| 4. | श्री. दिपक चौधरी | सदस्य |
| 5. | श्रीमती ममता ठाकुर | सदस्या |
| 6. | श्री. दिपक पटेल | सदस्य |
| 7. | श्री. शेषराव गोतमारे | सदस्य |
| 8. | श्रीमती शोभा पटेल | सदस्य |
| 9. | श्री. सुरेश दामोधर तळवेकर | सदस्य |
| 10. | श्री. राजेश श्रीनिवास माटे | सदस्य |
| 11. | श्री. दिपक दयाराम पेंदाम | सदस्य |
| 12. | श्री. किशोर गजभिये | सदस्य |
| 13. | श्री. संदीप प्रल्हाद सहारे | सदस्य |
| 14. | श्री. मधुकर नत्थुजी कांबळे | सदस्य |
| 15. | श्री. सतिश विठ्ठलराव होले | सदस्य |
| 16. | श्री. राजेश रामचरण जरगर | सदस्य |

## उपस्थित अधिकारी

1) श्री. विष्णुपद बुटे, अपर आयुक्त
2) श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

<u>ठराव क्रमांक 97</u> :— वार्ड क्र. 128 अंतर्गत सिंदीबन आणि जुने सक्करदरा या भागात 150 मी. मी. व्यासाची सी.आय. मुख्य जलवाहीनी टाकण्याच्या कामाकरिता जाहिरातीद्वारे दुसऱ्यांदा निविदा बोलविण्यात आल्या असता, प्राप्त एकुण दोन निविदापैकी निम्नतम निविदाकार मे. जी. एस. पात्रा, यांची रु. 11,01,953/— किमतीची व प्राकलनीय दरांपेक्षा 2.25 टक्केने कमी असलेली निम्नतम दराची निविदा स्वीकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 98</u> :— नागपूर महानगरपालिकेत म्युनिसीपल ई—गव्हर्नंस कार्यान्वित करण्याकरिता जरूरी **Supply and Installation of Networking equipments and maintenance services at Various offices of NMC for three years** साठी रेट कान्ट्रक्ट करिता मागविण्यात आलेल्या निवदेला मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेऊन प्रस्तावित विषय एकमताने नामंजूर, तसेच नेटवर्कींग (Net working) ची देखभाल व दुरुस्तीची स्वतंत्र निविदा 3 वर्षाच्या वॉरंटीसह, प्रस्तावित विषयातील ज्या त्रुटी आहेत त्यांना वगळुन काढण्यास व संगणक व इतर साहीत्याची केवळ पुरवठा व देखभाल दुरुस्तीची निविदा स्वतंत्र रित्या काढण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 99</u> :— मा. उच्च न्यायालय मुंबई ( खंडपीठ नागपूर ) चे जनहित याचिका क्र. 960/2009 मधील दिनांक 03.07. 2009 चे निर्णयाचे पालन करण्यास्तव मे. जे. के सिमेंट प्रॉडक्ट ॲन्ड कंपनी यांच्या विरूद्ध स्थायी समिती ठराव क्र. 127 दिनांक 26.08.2008 अन्वये घेतलेल्या निर्णयास मागे घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 100</u> :— वॉर्ड क्र. 26, कुंदनलाल गुप्तानगर, नागपूर महानगरपालिका शाळा ईमारतीचे प्रथम मजल्याचे बांधकाम करण्याच्या कामाकरिता निविदा मागविण्यात आल्या असता मे. लोटस् कन्स्ट्रक्शन यांची प्राकलनीय दरापेक्षा 15.28% नि कमी असलेली रु. 1678870.82 ची निम्नतम निविदा प्राप्त आहे. या निविदेस मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 101</u> :— नागपूर महानगरपालिका अग्निशमन व आणिबाणी सेवा विभागाकरीता बजट प्रावधान क्रमांक 570 "अग्निशमन सामुग्री खरेदी" अंतर्गत प्राप्त प्रावधान रु. 7,00,00,000/— (सात कोटी) मधून एकूण 8 नग चेचीस खरेदी करण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

| | | | |
|---|---|---|---|
| 1) | टाटा एलपीटी 1613/42 चेचीस शासकीय दरानुसार | 4 नग | रु. 39,33,783/- |
| 2) | आयसर 11.10 क्वाल आणि चेचीस डी.जी.एस. ॲण्ड डी दरानुसार | 4 नग | रु. 27,82,919/- |
| | **एकूण खर्च** | | रु. 67,16,702/- |

<u>ठराव क्रमांक 102</u> :- कन्हान व गोरेवाडा स्थित जलशुध्दिकरण केंद्रांना जलशुध्दिकरण प्रक्रीयेकरीता लागणाऱ्या द्रव पी.ए.सी.च्या वार्षीक खरेदीस्तव दर व एजेन्सी निश्चित करण्यास्तव बोलविण्यात आलेल्या ई-निविदेतील प्राप्त निविदा संदर्भांत खालील प्रस्तावाबाबत यथायोग्य निर्णय घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन,

1. प्राप्त निम्नतम दर रु. 12,745/- प्रति मे. टन यास वार्षिक दर म्हणुन मंजुरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.
2. द्रव PAC च्या वार्षिक खरेदीकरीता येणाऱ्या रु. 1,14,70,500/- च्या खर्चास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.
3. निविदा अटी व शर्तीप्रमाणे निम्नतम निविदाकार मे. पार्श्व असोसिएट्स यांचेकडून 70 टक्के म्हणजे 630 मे. टन द्रव PAC च्या खरीदीच्या रु. 80,29,350/- चे खर्चास व मे. कनोरीया केमीकल ॲड इंडस्ट्रिज लि. यांचेकडून उर्वरीत 30 टक्के म्हणजे 270 मे. टन द्रव PAC ची खरेदीच्या रु. 34,41,150/- च्या खर्चास मंजुरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 103</u> :- कन्हान व गोरेवाडा स्थित जलशुध्दिकरण केंद्रांकरीता लागणाऱ्या द्रव पी.ए.सी. (liquid P.A.C.) ची मात्रा संपुष्टात आल्याने तसेच पावसाळयाचे दिवस लक्षांत घेता शहराचा पाणी पुरवठा अबाधित ठेवण्याचे दृष्टिने निविदा अटी व शर्तीनुसार, निविदा मात्रेच्या 25 टक्के अतिरीक्त मात्रा मंजूर दरांवर निविदाकार मे. आदीकेम, नागपूर यांचेकडून खरेदी करण्यास व यावर येणाऱ्या रु. 36,60,000/- चे खर्चासह एकुण रु. 1,46,40,000/- + रु. 36,60,000/- = रु. 1,83,00,000/- चे खर्चास मंजूरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.